अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# आता मोदींनी महागाईमुक्त भारत करून दाखवावा

नरेंद्र मोदींच्या कार्यकर्तीला जवळपास १०० दिवसांपेक्षा जास्त कालावधी पूर्ण होईल. १५ ऑगस्टचे निमित्त साधून नरेंद्र मोदी पुन्हा एकदा आपल्या लोकप्रियतेची चाचपणी करतील कारण निवडणूक झाल्यापासून त्यांनी जनतेची थेट संवाद साधलेला नाही. निवडणूक काळामध्ये ४०० पेक्षा जास्त सभांमध्ये बोलून थकलेले नरेंद्र मोदी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरून काय भाषण करतात याकडे सामान्य जनतेपेक्षा मोठ्या उद्योगपतींचे भांडवलदाराचे आणि राजकारण्यांचेही लक्ष लागलेले आहे. गेल्या १०० दिवसांमध्ये सरकारने काय कामगिरी केली याचा सविस्तर अहवाल आपल्या भाषणातूनच मोदी तर देतीलच. परंतु त्याशिवाय संपूर्ण देशाचे लक्ष वेधले जाईल. अशा प्रकारच्या प्रकल्पांची किंवा योजनांची घोषणा मोदी १५ ऑगस्टला करण्याची शक्यता आहे. यासाठी स्वत: नरेंद्र मोदीदेखील बरीच जय्यत तयारी करीत आहेत. कारण पंतप्रधान झाल्यानंतर हे त्यांचे लाल किल्ल्यावरचे पहिलेच भाषण असेल. एकूणच त्यांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये या घटनेला विशेष महत्त्व आहे. ही संधी वाया जाणार नाही याची ते पूर्ण दक्षता घेतील आणि लोकांमध्ये एक नवा उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. कारण येत्या ६ महिन्यांमध्ये झारखंड, महाराष्ट्र, जम्मू काश्मिर या राज्यांमध्ये निवडणुका आहेत. त्याचा राजकीय लाभही मिळविण्याचा प्रयत्न होईल. यापूर्वी पंतप्रधान झाल्याझाल्या त्यांनी राष्ट्राला उद्देशून भाषण करावे, असा आग्रह धरला गेला होता. परंतु मोदींनी तो मोह टाळला कारण निवडणूक काळामध्ये प्रचंड भाषणबाजी झालीच होती. आता काही तरी काम करून दाखविल्याशिवाय नुसते भाषण करण्यामागे काहीच अर्थ नाही याचा त्यांनी अंदाज घेतला. त्यापेक्षा १५ ऑगस्टला सविस्तर भाषण करून आपण केलेल्या कामाची माहिती द्यावी आणि लोकांचा कल काय आहे हेही तपासून पाहावे, असा चाणाक्ष हेतू त्यांनी ठेवलेला दिसतो.

### मोदींची जय्यत तयारी

आज लोकांनी नरेंद्र मोदी यांच्या बाजूंनी आपला कौल दिला. आता त्यांना लोकांच्या बाजूने आपला कौल काय आहे हे लोकांना सांगायचे आहे. त्यातला सर्वांत महत्त्वाचा भाग असा की नवे सरकार असल्यानंतर महागाई कमी होईल आणि भ्रष्टाचार करणाऱ्यांचे पाश आवळले जातील, अशी लोकांची अपेक्षा होती. परंतु ती पाहिजे तशी पूर्ण झालेली नाही किंवा त्या दिशेने सकारात्मक पाऊलही पडलेले नाही महागाई एकदम कमी होणार नाही किंवा भ्रष्टाचार एकदम रोखला जाणार नाही, याची लोकांना कल्पना आहे. परंतु महागाई आहे त्यापेक्षा आणखी वाढू नये, एवढीच लोकांना खात्री हवी आहे. कारण मनमोहन सिंग यांच्या काळात महागाईचा हा भस्मासूर एवढा वाढला की त्याला आवर घालणे यूपीएच्या हाताबाहेर गेले. मोदी आल्यापासून महागाईला कोणताही मोठा लगाम बसलेला दिसत नाही. कारण रेल्वे भाडेवाढीचा त्यांनी दिलेला दणका किंवा पेट्रोल, डिझेलच्या किंमती रोखण्यात त्यांना आलेले अपयश महागाईला प्रोत्साहन देणारेच ठरले, अशा परिस्थितीत मोदी हे सामान्य माणसाला दिलासा देतील की नाही त्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे चांगले दिवस खरोखर येतील की, नाही याबद्दल लोकांच्या मनात प्रश्न निर्माण होत आहे.

### तरच लोकांचा विश्वास बसेल

या सर्व प्रश्नांची आणि शंकांची उत्तरे त्यांनी १५ ऑगस्टला दिली पाहिजेत अन्यथा आतापर्यंत लाल किल्ल्यावरून अनेक पंतप्रधानांची भाषणे झाली तशा अनेक घोषणाही होत गेल्या आणि शेवटी जय हिंद म्हणून भाषणेही संपविली जात होती. तीच परंपरा मोदी कायम ठेवतात की नव्या परंपरेला सुरुवात करतात याचेदेखील अनेकांना आकर्षण आहे. निवडणूक काळामध्ये सत्तेवर येण्याकरिता त्यांनी काँग्रेसमुक्त भारत आणि भ्रष्टाचार मुक्त भारत घोषणा दिल्या होतात आता या घोषणांपैकी लोकांनी काँग्रेसमुक्त भारत ही घोषणा सिध्द करून दाखविली आता मोदींनी भ्रष्टाचारमुक्त आणि महागाईमुक्त भारत ही घोषणा प्रत्यक्षात आणून दाखवावी. कारण लोकांना आता या गोष्टींपासूनच स्वातंत्र्य हवे आहे. या दोन गोष्टींनी लोकांना अक्षरश: गुलाम बनविले आहे. म्हणूनच स्वातंत्र्यदिनाला नव्या घोषणा न करता या दोनच गोष्टींची त्यांनी पूर्तता केली. तर त्यांनी पुष्कळ केल्यासारखे होईल. त्यांचे लाल किल्ल्यावरचे भाषण नवीन लोकप्रियता मिळविणारे असू शकेल, तर तो लोकांना खरा दिलासा असेल. या गोष्टी त्यांनी करून दाखवाव्यात त्यातून ते लोकांचा जास्त विश्वास संपादन करू शकतील.